**Reliance**
Industrial Infrastructure
Limited

**नोंदणीकृत कार्यालय:** एन के एम इंटरनॅशनल हाऊस, ५वा मजला, १७८ बॅकबे रिक्लमेशन,
एल् आई सी योगक्षेमा बिल्डिंगच्या मागे, बाबुभाई चिनाय मार्ग, मुंबई – ४०० ०२०
दूरध्वनी: +९१ २२ ४४७७ ९०५३ • फॅक्स: +९१ २२ ४४७७ ९०५२ • ईमेल: investor_relations@riil.in
CIN: L60300MH1988PLC049019

# सूचना

## वार्षिक सर्वसाधारण सभा

ह्याद्वारे सूचना देण्यात येत आहे की **रिलायन्स इंडस्ट्रियल इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड (''कंपनी'') च्या सदस्यांची एकतीसावी वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवार दिनांक २८ ऑगस्ट, २०१९ रोजी सकाळी ११ वाजता २रा मजला, बाबुभाई चिनाई कमीटी रूम, आयएमसी चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्री, आयएमसी मार्ग, चर्चगेट, मुंबई–४०० ०२० (''सभा'') येथे होईल.**

सभा बोलाविणाऱ्या सूचनेसह आर्थिक वर्ष **२०१८–१९** चा **वार्षिक अहवाल** सदस्यांना त्यांच्या नोंदणी करण्यात आलेल्या पत्यावर पोस्टाने/कुरिअरने पाठविण्यात आला आहे आणि ज्यांनी डिपॉझिटरीज/ कंपनी यांच्यापाशी आपला ई–मेलचा पत्ता नोंदविला आहे अशा सदस्यांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठविण्यात आला आहे.

सभेच्या सूचनेसह आर्थिक वर्ष २०१८–१९ साठी एकत्रीत वार्षिक अहवाल कंपनीच्या वेबसाईटवर (www.riil.com) उपलब्ध आहे आणि त्याचप्रमाणे सभेच्या तारखेपर्यंत शनिवार, रविवार आणि सार्वजनिक सुट्यांव्यतिरिक्त सर्व कामकाजाचे दिवशी कार्यालयीन वेळेत कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात तपासणीसाठी उपलब्ध आहे.

सभेमध्ये मंजूर करण्यात येणाऱ्या प्रस्तावित ठरावांवर इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करण्याचा (''ई–मतदान'') त्यांचा अधिकार बजावण्यासाठी कंपनीने सदस्यांसाठी सुविधा उपलब्ध केली आहे. सदस्य सभेच्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणाहून इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रणेचा उपयोग करून आपले मतदान करू शकतात (**''दूरस्थ ई–मतदान''**). कंपनीने कार्वी फिनटेक प्रायव्हेट लिमिटेड (**''कार्वी''**) यांची ई–मतदान सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी एजन्सी म्हणून सेवा घेतली आहे.

दूरस्थ ई–मतदान आणि युजर आयडी व पासवर्ड ह्यासंबंधी पत्र व सभेची माहिती देणाऱ्या सूचनेची प्रत सदस्यांना पाठविण्यात आली आहे. ई–मतदानासाठीचा पत्राचा नमुना कंपनीच्या वेबसाईटवर www.riil.com येथे आणि कार्वी यांच्या वेबसाईटवर: https://evoting.karvy.com येथे उपलब्ध आहे.

**दूरस्थ ई–मतदान सुविधा शनिवार, २४ ऑगस्ट, २०१९ रोजी सकाळी ९ वाजता सुरू होईल आणि मंगळवार, २७ ऑगस्ट, २०१९ रोजी सायंकाळी ५ वाजता बंद होईल. ह्या तारखेनंतर आणि वेळेनंतर दूरस्थ ई–मतदान करण्याची परवानगी नाही.**

**बुधवार, २१ ऑगस्ट, २०१९ ह्या तारखेला ज्या सदस्यांचे/लाभधारकाचे नाव कंपनीच्या रजिस्टरवर असेल फक्त तेच दूरस्थ ई–मतदानास/सभेच्या ठिकाणी ई–मतदान करण्यास पात्र असतील.**

सभेची सूचना पाठविल्यानंतर एखादी व्यक्ती कंपनीची सदस्य बनल्यास आणि समभाग धारण करत असल्यास, त्यांनी एसएमएस सुविधेचा उपयोग करून किंवा **evoting@karvy.com** येथे विनंती पाठवून यूजर आयडी व पासवर्ड मिळवावा. यूजर आयडी व पासवर्ड मिळविण्याची तपशिलवार पद्धती सभेच्या सूचनेत देण्यात आली आहे जी कंपनीच्या वेबसाईटवर आणि कार्वी यांच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे. जर सदस्याने कार्वी यांचेपाशी दूरस्थ ई–मतदानासाठी अगोदरच नोंदणी केली असेल तर तो त्या युजर आयडीचा आणि पासवर्डचा उपयोग दूरस्थ मतदान करण्यासाठी करू शकतो.

**ज्यांनी दूरस्थ मतदानाद्वारे त्यांचे मतदान केले असेल असे सदस्य सभेला उपस्थित राहू शकतील परंतु पुन्हा मतदान करण्यास पात्र नसतील.**

इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करण्याची सुविधा सभेच्या ठिकाणी उपलब्ध करून देण्यात येईल (**''इन्स्टा पोल''**) आणि ज्यांनी दूरस्थ ई–मतदान पद्धतीने त्यांचे(ची) मत(ते) दिलेली नाहीत असे सभेला उपस्थित राहणारे सभासद इन्स्टा पोलच्या द्वारे सभेच्या ठिकाणी मतदान करू शकतील.

ई–मतदानासंबंधी चौकशीसाठी/तक्रारीसाठी खालील संपर्काच्या तपशिलाची नोंद घेण्याची विनंती सदस्यांना करण्यात येत आहे:

श्री. एस्. पी. वेणूगोपाल – जनरल मॅनेजर, कार्वी फिनटेक प्रायव्हेट लिमिटेड, कार्वी सेलेनियम टॉवर बी, प्लॉट ३१–३२, गचीबॉवली, फायनानशीयल डिस्ट्रीक्ट, नानक्रमगुडा, हैद्राबाद – ५०० ०३२, दूरध्वनी क्र. +९१ ४० ६७१६ १७००, टोल फ्री नं. १८००–३४५४–००१, ई–मेल: evoting@karvy.com

## रेकॉर्ड तारीख

कंपनी कायदा, २०१३ मधील कलम ९१ अन्वये आणि त्या अंतर्गत लागू नियमांतर्गत सूचना देण्यात येत आहे की, कंपनीने आर्थिक वर्ष २०१८–१९ साठी लाभांश मिळविण्यासाठी पात्र सदस्य निश्चित करण्यासाठी बुधवार, २१ ऑगस्ट, २०१९ ही ''**रेकॉर्ड तारीख**'' म्हणून निश्चित केली आहे. सभेमध्ये लाभांश घोषित करण्यात आल्यास, तो सभा संपल्यानंतर एक आठवड्याच्या आत देण्यात येईल किंवा त्याचे वॉरन्टस पाठविण्यात येतील.

संचालक मंडळाच्या आदेशाने
सही/–
**शैलेश ढोलकिया**
*कंपनी सचिव आणि कम्पलायंस ऑफिसर*

ठिकाण : मुंबई
दिनांक : ४ ऑगस्ट, २०१९

www.riil.in